# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

**(०२४०)२३३४२१६ (P) २३३४७६९ (O) Fax-२३५६८२०**

**website: www.dteau.org email: educationsection@dteau.org**


जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०१६/०३८०

दिनांक 23 DEC 2016

प्रति,

प्राचार्य,

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित

व कायम विनाअनुदानित तंत्रनिकेतन संस्था,

औरंगाबाद विभाग

विषयः- 'राष्ट्रीय सेवा योजना' तंत्रशिक्षण संचालनालयाच्या शासकीय / अशासकीय तंत्रनिकेतनामध्ये सुरु करण्याबाबत.

संदर्भः- ०१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक १(२)रासेयो/२०१६/३६१ दिनांक २६ आक्टोबर २०१६

०२. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक रासेयो-२०१४/प्र.क्र.४२/ १४/साशि-७, दिनांक ६ सप्टेंबर २०१४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांनी संदर्भ क्र.०१ नुसार औरंगाबाद विभागातील ज्या संस्थाना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची / संचालनालयाची मान्यता असलेल्या तसेच शासनाच्या / संचालनालयाच्या सर्व नियमाचे पालन करणा-या सर्व तंत्रनिकेतनामध्ये **'राष्ट्रीय सेवा योजना'** सुरु करणेसाठी आदेशीत करण्यात आले आहे.

तेंव्हा औरंगाबाद विभागातील सर्व प्राचार्य, शासकीय/अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित तंत्रनिकेतन संस्था, याना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत **'राष्ट्रीय सेवा योजना'** सुरु करण्या बाबत आदेशीत करण्यात येत आहे . ( सोबत योजनेची मार्गदर्शक तत्वे बाबतचा शासन निर्णय स्वतंत्रपणे जोडण्यात येत आहे.) त्यानूसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबतः- संदर्भिय पत्र व शासन निर्णय प्रत.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
3, महापालिका मार्ग पत्र पेटी क्र. 1967, मुंबई 400 001.
**E-mail :-** desk9@dte.org.in **Web :-** http://www.dte.org.in
**दुरध्वनी** - 22620601, 22690602, 22641150/51 **फॅक्स** - 22692102

क्रमांक – 9(2)/रासेयो/2016/३६१
दिनांक – 26 OCT 2016

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद
अमरावती व नागपूर

विषय - राष्ट्रीय सेवा योजना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या शासकीय/अशासकीय तंत्रनिकेतनामध्ये सुरु करण्याबाबत

उपरोक्त विषया संदर्भात शासनाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्या खालिल शासकीय/अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतनामध्ये राष्ट्रीय सेवा योजना सुरु करण्याबाबत आदेशित केलेले आहे. याबाबत संचालनालयाने सुचित केल्यानुसार काही संस्थांचे प्रस्ताव अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

त्याअनुषंगाने आपणांस सुचित करण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना ही 100% केंद्र पुरस्कृत योजना आहे. सदरहू योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान राज्य शासनाकडून संस्थांच्या आयोजित उपक्रम/कार्यक्रमानुसार दरवर्षी दोन हप्त्यात देण्यात येते. सध्या शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर, अमरावती व वाशिम या 3 संस्थांमध्ये सदर योजना सुरु आहे. प्रत्येक नवीन संस्थेसाठी 20 (10 मुले व 10 मुली) विद्यार्थी संख्या व 1 अधिव्याख्याता(संस्थेतील मंजूर पदापैकी) कार्यक्रम समन्वयक मंजूर करण्यात येत आहे. आपल्या विभागातंर्गत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची व शासनाची/संचालनालयाची मान्यता असलेल्या तसेच शासनाच्या/संचालनालयाच्या सर्व नियमांचे पालन करणा-या सर्व तंत्रनिकेतनांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना सुरु करण्याबाबत आदेशित करण्यात येत आहे. (सोबत योजनेची मार्गदर्शन तत्वे बाबतचा शासन निर्णय स्वतंत्रपणे जोडण्यात येत आहे.) योजनेच्या कार्यक्रम समन्वयकांच्या (अधिव्याख्याता) प्रशिक्षणासाठी अहमदनगर कॉलेज, अहमदनगर यांच्याशी संपर्क साधून संस्थेच्या सोयीनुसार प्रशिक्षणासाठी पाठविण्यात यावे. याबाबतचा अहवाल या संचालनालयास सादर करावा.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 9553
दिनांक 7 NOV 2016

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

सोबत - शासन निर्णय प्रत

letter to College

राष्ट्रीय सेवा योजना
स्वयंसेवकांचा राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश देण्यासाठी नियमावली व नियमित उपक्रम आणि विशेष शिबिराची मार्गदर्शक तत्वे.

महाराष्ट्र शासन
उच्च तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः रासेयो-२०१४/प्र.क्र.४२/१४/साशि-७
मंत्रालय कक्ष, एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, मुंबई ४०० ००१
दि. ६ सप्टेंबर, २०१४

प्रस्तावना

उपक्रम राबविण्यासाठी व दत्तक गावाची निवड करताना काही मार्गदर्शक तत्वे असावी. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सल्लागार समितीच्या सभेत चर्चा झाल्याप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देताना संदिग्धता दिसून येते. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर २ वर्षात त्यांचा सर्वांगिण विकास होतो. जसे सभाधारिष्ठ, सुप्त गुणांना वाव मिळून अनेक विद्यार्थी सर्वगुणसंपन्न होतात. भावी काळात अत्यंत यशस्वी नागरिक म्हणून गौरविले जातात. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेपासून आजपावेतो ही योजना उत्कृष्ठपणे राबविली जाते. दरवर्षी रासेयोमध्ये विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून नव्याने सामाविष्ठ होतात. सर्व विद्यार्थ्यांना योग्य न्याय देण्यासाठी एक नियमावली तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तसेच समाजभिमुख उपक्रम राबविण्यासाठी व दत्तक गावाची निवड करताना काही मार्गदर्शक तत्वे असावी. ही बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय -

**स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये प्रवेश देण्यासाठी नियमावली :**

१) स्वयंस्फुर्तीने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश प्रथम असावा.
२) प्रवेश देताना अनुसूचित जाती व जमातीतील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.
३) विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षामध्ये एकाच योजनेमध्येच प्रवेश असावा.
उदा. एन.सी.सी./एन.एस.एस./विस्तार व निरंतर शिक्षण विभाग इत्यादी.
४) विद्यार्थ्यांची निवड करताना त्याने/तिने महाविद्यालय किंवा स्वयंसेवी संस्था स्तरावर सामाजिक कार्याशी निगडीत प्रकल्प देवून प्रकल्पाच्या मुल्यमापनावर आधारित प्रवेश देण्यात यावा. किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याने तीन सलग कार्यक्रमकांचे आयोजन करुन सर्व कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.
५) + २ स्तर, पदवी आणि पदव्यूत्तर विभागातील विद्यार्थ्यांना रासेयोमध्ये प्रवेश देताना यापूर्वी रासेयोतील सहभाग असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्य द्यावे.
६) रासेयोमध्ये प्रवेश देताना विशेष विद्यार्थ्यांना (अंध, अपंग, शारीरिकदृष्ट्या विकलांग) प्राधान्य देण्यात यावे.
७) रासेयोमध्ये प्रवेश देताना कमी अवधान (अबोल, बुजरा नेतृत्व गुण नसणारा इ.) असलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य द्यावे. ज्यायोगे दोन वर्षानंतर तो अष्टावधानी होऊ शकेल.
८) सर्व शाखेतील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यात यावी.
९) रासेयोमध्ये प्रवेश देताना मुले व मुली यांना समान संधी देण्यात यावी.
१०) विद्यार्थी राष्ट्रीय भावनेत प्रेरित असलेल्या सामाजिक बांधिलकी जपणारा असावा.
११) रासेयोमध्ये प्रवेश देताना अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात यावे.
१२) विद्यार्थी व्यसनाधीन नसावा तसेच शिस्तप्रिय असावा.
१३) रासेयोमध्ये प्रवेश देताना विद्यार्थ्यांचे वय २५ पेक्षा जास्त असू नये. यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वयोमर्यादेमध्ये तीन वर्षाची सूट देण्यात यावी.
१४) रासेयोमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सात दिवसाचे निवासी शिबिर करणे बंधनकारक आहे.

## नियमित कार्यक्रमाची मार्गदर्शक तत्वे

१) रासेयो उपक्रम हे २ वर्षामध्ये प्रतिवर्षी १२० तास म्हणजे एकूण २४० तास व दोन्ही वर्षात मिळून एक सात दिवसीय निवासी शिबीर.

२) प्रथम वर्ष रासेयो स्वयंसेवकासाठी तासाची विभागणी -
- २० तास उद्बोधन सत्र (Orientation Programme)
- २० तास महाविद्यालयस्तर उपक्रम
- २० तास विद्यापीठाने पुढाकार घेतलेले उपक्रम
- ६० तास वस्ती पातळीवरील दत्तक गाव येथे राबविण्यासाठी उपक्रम
(कमीत कमी २ उपक्रम असावेत व उपक्रमांच्या तासांची मर्यादा कमीत कमी २० व जास्तीत जास्त ६० तास इतकी असावी.)

३) द्वितीय वर्ष रासेयो स्वयंसेवकांसाठी तासांची विभागणी-
- २० तास महाविद्यालय स्तरावरील कार्यक्रम/उजळणी
- २० तास विद्यापीठाने पुढाकार घेतलेले उपक्रम
- ८० तास वस्ती पातळीवरील दत्तक गाव/खेडे येथील उपक्रम

४) रासेयो स्वयंसेवकांकरिता उद्बोधन सत्र अंतर्गत खालील उपक्रमांचा समावेश असावा.
- रासेयो विषयी सर्वसाधारण उद्बोधन (रासेयोचा इतिहास, रासेयो जडणगडण, रासेयो उद्दिष्टे, ध्येय याविषयी मार्गदर्शन)
- विशेष उपक्रमाविषयीचे उद्बोधन
- कौशल्यावर आधारित उद्बोधन
- विशेष शिबिरांसाठी उद्बोधन

५) महाविद्यालयस्तर उपक्रम -
- सदर उपक्रम दरम्यान विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठा शिकविणारे उपक्रम राबविण्यात यावेत.
- महाविद्यालय परिसर विकसित करण्यासाठी उपक्रम - उदा. क्रिडांगण तयार करणे, वृक्षारोपण उर्जा लेखा-जोखा (Energy Audit), पर्यावरण संवर्धन, वृक्षगणना, हटिंग हजार्ड, (धोके शोध मोहिम) इत्यादी.

६) विद्यापीठाने पुढाकार घेवून योजलेले उपक्रम
- उदा. समर्थ भारत अभियान, मुनीजन ग्राम अभियान, ऊर्जा संवर्धन, कन्यारत्न अभियान, रस्ता सुरक्षा अभियान, रासेयो प्रचार व प्रसार सप्ताह इत्यादी.
- विद्यापीठ सल्लागार समितीने सूचविलेल्या विशेष मोहिमा/उपक्रम

७) खेडे/दत्तकगाव पातळीवरील उपक्रम -
- स्वयंसेवकांना समाजामधील विविध प्रश्नांची जाणीव होणे व त्या संदर्भात उपक्रम राबविण्यासाठी जास्तीत जास्त तास वसती पातळीवरील उपक्रमांकरिता राखून ठेवण्यात आले आहे. सदर उपक्रमांमधून विद्यार्थी व व्यक्तीमध्ये एक सामाजिक बंध निर्माण होवून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व व्यक्तिमत्व विकास घडण्यास मदत होईल असे उपक्रम राबविण्यात यावेत.
- सामाजिक स्वयंसेवी संस्थामार्फत वसतिपातळीवरील विविध प्रश्नांवर कार्यक्रम/उपक्रम उदा. वृध्दाश्रम, अनाथाश्रम, निवासी सामाजिक उपक्रम करणाऱ्या संस्था.
- ग्राम विकासाचे उपक्रम - उदा. साक्षरता जल व माती व्यवस्थापन, शेती विषयक उपक्रम, आरोग्य, बालसंगोपन, बचत गट, रस्ते बांधणी किंवा दुरुस्तीकरण.

८) शहरी भागातील उपक्रम -
- साक्षरता, वसतिविकास, स्वच्छता, नागरी, सुरक्षा, अनाथालये, सार्वजनिक इस्पितळे, लोकसंख्या शिक्षण, नशाबंदी उपक्रम, एडस् प्रतिबंधक उपक्रम इत्यादी कार्यक्रमांतून सहभाग.

९) राष्ट्रीय व नैसर्गिक / मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापनाचे उपक्रम.

- भूकंप, पूर, वादळ, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट बॉम्बस्फोट इत्यादि नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापन.

१०) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्वाचे दिवस व सप्ताह रासेयो अंतर्गत महाविद्यालयात साजरे करणे.

## विशेष शिबिराची मार्गदर्शक तत्वे

विशेष शिबीर हा राष्ट्रीय सेवा योजनेचा आत्मा असल्यामुळे शिबिराचे नियोजन, आयोजन व यशस्वीरित्या पूर्तता हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. शिबीर हा राष्ट्रीय सेवा योजनेचा अविभाज्य घटक आहे. या शिबीरात युवकांसाठी खूप चांगल्या प्रकारची संधी आहे. कारण यामध्ये विद्यार्थ्यांना एकत्र राहणे, एकमेकांच्या अनुभवाची देवाण-घेवाण करणे. सतत सामाजिक गोष्टींच्या चर्चेद्वारे विचार-विनिमय करणे, सामाजिक प्रश्नांची चर्चा करुन ते प्रश्न, समस्या, अडचणी यावर उपाय शोधण्यासाठी प्रयत्न करणे. राष्ट्रीय सेवा योजनेत असलेल्या संख्येच्या ५० टक्के स्वयंसेवक विशेष शिबिरात सहभागी होतात व इतक्या मोठ्या प्रमाणात असणाऱ्या या युवकांच्या माध्यमातून फार मोठ्या प्रमाणात दर्जेदार व उत्कृष्ट असे काम उभे राहू शकते.

**शिबीराचा उद्देश :-** विशेष शिबिर देशपातळीवरील विविध प्रगतीच्या दृष्टिने महत्वाचे असणाऱ्या विषयाचा गाव पातळीवर अवलंब होण्यासाठी केला जातो. आजपर्यंत विशेष शिबिराच्या माध्यमातून युवक व खेड्यांचा विकास "बलशाली भारतासाठी सृदृढ युवक", "राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक एकात्मता", "साक्षरता व युवक", शास्वत प्रगतीसाठी युवक", यामध्ये सी.सी.टी.व्ही., पाणी व व्यवस्थापन व नियोजन, नापीक जमीन व्यवस्थापन, वृक्षारोपण, बंधारे बांधणे, एड्स् जनजागृती इत्यादि संकल्पना राबविल्या आहेत.

सन २०१४-१५ करिता "जल व्यवस्थापन" अशी केंद्रीय संकल्पना देण्यात येत आहे.

- शिबिरात जेवण हे साधे, रुचकर व स्वयंसेवकांच्या मदतीने बनविलेले असावे.
- दत्तक गावाच्या आवश्यकतेनुसार व लोकांच्या गरजेनुसार लोकांच्या सहभागातून उपक्रम राबवावेत.

**शिबीरातील कार्यक्रम**

१. शिबीरातील दिनचर्या ही ग्रामीण भागाशी मिळती-जुळती व स्वयंसेवाकांच्या दृष्टीने हितकारक असावी. त्यामुळे शिबीरात शिस्त व सक्रिय सहभाग राहील.

२. विशेष शिबीर हे ग्रामस्थांशी सुसंवाद व त्यांच्यामधून अनेकविध गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी असावे.

३. श्रमदान, सांस्कृतिक, बौध्दिक कार्यक्रमांद्वारे स्वयंसेवक व ग्रामस्थांना एकत्रित आणण्याचा प्रयत्न असावा.

४. शासकीय/निमशासकीय/स्वयंसेवी/स्थानिक मंडळ/सामाजिक कार्य संस्था यांचा सहभाग घ्यावा.

५. शिबीर पूर्वतयारी म्हणून सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांच्या पालकांची बैठक आयोजित करावी.

६. प्राचार्य, सल्लागार समिती व विद्यापीठ कार्यक्रम समन्वयक यांच्यामध्ये समन्वयन साधणे.

**राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक उपक्रमांचे/विशेष दिवस/सप्ताह यांचे नियोजन**

| महिना | उपक्रम |
|---|---|
| जून | १. ५ जून - जागतिक पर्यावरण दिवस.<br>२. कार्यक्रम अधिकारी नियोजन बैठक<br>३. रा.से.यो. स्वयंसेवकाचे नोंदणी अर्ज व इतर आवश्यक माहिती.<br>४. 'आव्हान' आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन. |
| जुलै | १. ११ जुलै -जागतिक लोकसंख्या दिवस.<br>२. १ ते ७ जुलै - वन महोत्सव सप्ताह.<br>३. ८ ते १४ जुलै - आंतरराष्ट्रीय साक्षरता सप्ताह.<br>४. विद्यार्थ्यांची रा.से.यो. उपक्रमात नोंदणी.<br>५. कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग.<br>६. नियमित उपक्रमांचा आरंभ |

| | |
|---|---|
| ऑगस्ट | १. १५ ऑगस्ट - स्वतंत्रता दिवस<br>२. २० ऑगस्ट - सदभावना दिवस<br>३.. रा.से.यो. मधील विद्यार्थ्यांची नोंदणी पूर्ण करणे.<br>४. स्वयंसेवकांसाठी उद्बोधन सत्र.<br>५. गटनिहाय उपक्रमांचे नियोजन.<br>६. महाविद्यालयीन स्तरावर सल्लागार समितीचे गठन व बैठक<br>७. नेतृत्वगुण विकास शिबीराचे आयोजन (पाच दिवसीय)<br>८. दत्तक गाव निवड |
| सप्टेंबर | १. ११ सप्टेंबर - आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस<br>२. १५ सप्टेंबर - आंतरराष्ट्रीय शांतता दिवस<br>३. २४ सप्टेंबर - रा.से.यो. दिवस<br>४. विद्यापीठांकडे स्वयंसेवक नोंदणी यादी पाठविणे.<br>५. २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर - राष्ट्रीय सेवा योजना प्रचार व प्रसार सप्ताह साजरा करणे.<br>६. दत्तक गाव निवड<br>७. सात दिवसीय निवासी शिबिराचे नियोजन<br>८. अर्ध वार्षिक अहवाल तयार करून विद्यापीठाकडे सादर करणे.<br>९. नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरासाठी अनुदानाचे प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविणे.<br>१०. प्रजासत्ताक दिन संचलन व उत्कर्ष - सामाजिक व सांस्कृतिक महोत्सवासाठी (स्वयंसेवकांची निवड.) |
| ऑक्टोबर | १. १ ऑक्टोबर - राष्ट्रीय रक्तदान दिवस<br>२. २ ऑक्टोबर - गांधी जयंती / आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस<br>३. दिवाळी सुट्टी दरम्यान शिबीरांचे आयोजन<br>४. राज्यस्तरीय / पश्चिम विभागीय / साहसी क्रिडा / युवा महोत्सव / मेगा शिबिर / राष्ट्रीय एकात्मता शिबिर इत्यादीसाठी स्वयंसेवकांसाठी निवड व प्रोत्साहित करणे. |
| नोव्हेंबर | १. १९ नोव्हेंबर - राष्ट्रीय आदानप्रदान दिवस<br>२. १९ ते २५ नोव्हेंबर - कौमी एकता सप्ताह<br>३. कौमी एकता सप्ताह साजरा करणे.<br>४. हिवाळी शिबीर आयोजित करणे.<br>५. आयोजित हिवाळी शिबीरांचे लेखे सादर करणे.<br>६. अर्धवार्षिक कार्यक्रम अधिकाऱ्यांची आढावा बैठक |
| डिसेंबर | १. १ डिसेंबर - जागतिक एडस् दिवस<br>२. १० डिसेंबर - जागतिक मानव अधिकार दिवस<br>३. जागतिक एडस् दिवस / सप्ताह मधील उपक्रमांचे आयोजन<br>४. नाताळ सुट्टीतील विशेष शिबीरांचे आयोजन<br>५. उत्कर्ष - सामाजिक, सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन |
| जानेवारी | १. १२ जानेवारी - राष्ट्रीय युवा दिवस<br>२. २६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन<br>३. ३० जानेवारी - हुतात्मा दिवस<br>४. १२ ते १९ जानेवारी - राष्ट्रीय युवा सप्ताह |

| | |
|---|---|
| | ५. तिमाही अहवाल पाठविणे.<br>६. राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे. |
| फेब्रुवारी | १. १० गुण / १२० तास उपक्रमांची पडताळणी सत्र व १२० तास पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची यादी आणि अहवाल सादर करणे.<br>२. २४० तास व शिबिरांचे प्रमाणपत्रासाठी यादी सादर करणे.<br>३. इंदिरा गांधी राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कारासाठी एकक / कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांचे प्रस्ताव पाठविणे.<br>४. नियमित कार्यक्रम व विशेष शिबीरांचे परिक्षित लेखांचे सादरीकरण<br>५. कार्यक्रम अधिकाऱ्यांचा मूल्यमापन सत्रांचे आयोजन |
| मार्च | १. ८ मार्च - आंतरराष्ट्रीय महिला दिवस<br>२. १० गुणांसाठी प्रमाणित याद्या परीक्षा विभागाकडे सादरीकरण<br>३. अपरिहार्य कारणांमुळे परिक्षित लेखे सादर न करणाऱ्या महाविद्यालयांना लेखे सादर करण्याची अंतिम मुदत.<br>४. सल्लागार समितीची बैठक |
| एप्रिल | १. ७ एप्रिल - जागतिक आरोग्य दिवस<br>२. ग्रीष्मकालीन (Theme/Base) शिबिरांचे आयोजन |
| मे | १. २१ मे - आंतकवाद विरोधी दिवस<br>२. ३१ मे - जागतिक धुम्रपान विरोधी दिवस<br>३. राज्यस्तरीय आव्हान आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरांकरिता विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया<br>४. रा.से.यो. मधील वित्तीय वर्षातील स्वयंसेवकांसाठी प्रोत्साहनपर विशेष उपक्रम. |

राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाची योग्यरितीने अंमलबजावणी व्हावी. यासाठी ही नियमावली तयार करण्यात आली असून ही सर्व मार्गदर्शक तत्वे आहेत. या आधारावर उपक्रम राबविले जावेत यादृष्टीने ही नियमावली तयार करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून संगणक संकेतांक क्रमांक २०१४०९०६१६४२०२३००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( डॉ. अतुल हं. साळुंके )
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी)

# संकल्पना टिप्पणी

## स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विद्यापीठांनी ५ गांवे दत्तक घेणेबाबत

महात्मा गांधी जन्मशताब्दी निमित्ताने मा. प्रधानमंत्री यांनी स्वच्छ भारत अभियानांची सुरुवात केली. त्याचा भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने 'मुनीजन' अंतर्गत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयाने एक गांव दत्तक घ्यावे असे निर्देश दिले. स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत मा. मंत्री ग्रामीण विकास पंचायत राज आणि पाणी व स्वच्छता, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची सेवा राष्ट्र उभारणीच्या कामासाठी व्हावी म्हणून आपल्या विद्यापीठाने ५ गांवे दत्तक घेवून आर्दशगांव करण्यांसाठी आपले सहकार्य अपेक्षित आहे.

२. विद्यापीठ आदर्शगांव निर्माण करण्यासाठी व उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आपल्याला खालील गोष्टीनुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१) विद्यापीठ दत्तक गांव योजनेची मार्गदर्शक सूचना काढणे.

२) दत्तक गांव निवडीसाठी दि. ३१ मे, २०१५ पर्यंत निवडीची प्रक्रिया पूर्ण करणे आणि दत्तक गावांची यादी आपल्या संकेत स्थळावर व उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करणे.

३) विद्यापीठाने नोडल अधिकाऱ्याची निवड करणे, विद्यापीठस्तरावर दत्तक ग्राम योजना कार्यवाही पाहण्यासाठी व त्यांच्याशी पत्रव्यवहार करण्यासाठी त्यांचे नांव पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ई-मेल इ. माहिती संकेतस्थळावर तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागातील राष्ट्रीय सेवा योजना या कार्यालयाकडे पाठविणे.

४) जिल्हास्तरावर विविध उपक्रमाची कार्यवाही करण्यासाठी समन्वयकाची नेमणूक करणे हे अधिकारी गावांतील सरपंच, पोलिस पाटील, ग्राम पंचायत सदस्य, महिला बचतगट, युवक मंडळे इ. बरोबर समन्वय साधून जनजागृतीचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करतील.

५) जनजागृती करण्यासाठी आपल्या विद्यापीठातील लोककला विभाग, संगीत विभाग, सांस्कृतिक विभाग व प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग यांच्याद्वारे जनजागृती शिबिर भित्ती पत्रके, कला पथक, पदयात्रा, नुक्कड नाटक, निबंध, वकृत्व, चित्रकला या स्पर्धांचे आयोजन करणे. सांस्कृतिक व क्रिडा स्पर्धाचे आयोजन करणे, आरोग्य शिबिरे घेणे, वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेणे.

वरील जनजागृती व वातावरण निमित्तीसाठी करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे प्रलेखन (documentation) करावे व त्यांचा तपशील संकेतस्थळावर देण्यात यावा.

६) आधारभुत सर्वेक्षण (Baseline Survey) राष्ट्रीय सेवा योजना, माहिती व तंत्रज्ञान विभाग, संख्याशास्त्र विभाग व संगणक विभाग यांच्यामार्फत गांवाचे योजनेअंतर्गत सर्वेक्षण करण्याचे काम जुलै, २०१५ अखेर पूर्ण करावे त्यावरून गावांचा विकास आराखडा बनवावा व तो बनवतांना खालील टप्पे विचारात घ्यावेत.

अ) सदयस्थितीचे अवलोकन : गांवातील सामाजिक भौतिक व नैसर्गिक परिस्थितीचे अवलोकन, सुक्ष्म नियोजन कार्यपध्दती, भूगोल विभागामार्फत (GIS) या प्रणालीद्वारे गुगल मॉपिंगवर आराखडा तयार करणे.

ब) गांवाचा दर्जा निश्चित करताना गावातील सर्व घटाकांशी विचार विनिमय करणे व त्यावरून कालबध्द असा कृती आराखडा तयार करावा व आराखडा बनवताना विद्यार्थ्यांना शक्य असलेल्या उपक्रमांचा समावेश करावा व त्यासाठी आवश्यक निधी विविध शासकीय यंत्रणाकडून गांवासाठी वळवण्यासाठी त्याच्या बैठकाचे आयोजन करून विविध शासकीय अधिकारी तज्ञ यांचे कार्यगट बनवावेत.

३. विद्यापीठ दत्तक गांवामध्ये करावयाच्या विकास कामाचा अग्रक्रम तपशील व कालावधी पुढीलप्रमाणे :

अ) सप्टेंबर, २०१५ मध्ये वातावरण निमित्त करणे व आदर्श गांव करण्याकडे वाटचाल - राष्ट्रीय सेवा योजनेचे ७ दिवसीय शिबिराचे आयोजन करणे. त्यामध्ये स्वच्छ भारत मिशन अंमलबजावणी करणे.

ब) आरोग्य केंद्राद्वारे लसीकरणात शिबिराचे आयोजन

क) शालेय स्वच्छतागृहाची / सार्वजनिक स्वच्छतागृहाची स्वच्छता करणे, शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून देणे, आरोग्य शिबिराचे आयोजन करणे, पशुवैद्यकिय चिकित्सा शिबीराचे आयोजन करणे.

ड) स्वच्छता मोहिमेअंतर्गत शौचालये बांधण्यास प्रवृत्त करणे.

इ) श्रमदानाद्वारे शौचालये निमित्तीस प्रोत्साहन देणे.

४. सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन / शोषखड्डे, सांडपाण्याचा योग्य निचरा, परसबाग निमित्ती, गटरातं पाणी नदीला न जोडता त्या पाण्याचे शेतीसाठी पुर्नवापर करणे.

५. घनकचराचे व्यवस्थापन / कंपोस्ट खत : गांडुळ खत प्रकल्प निमित्ती प्रारुप तयार करणे, ओला कचराचे नियोजन करणे, कचराकुंडीचा वापर करणे, कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट करणे इत्यादीचा प्रचार व प्रसार करणे.

६. पाणी शुध्दीकरण प्रक्रियेचा प्रसार : वगराळे (पळी) चा वापर करणे. पाणी शुध्दीकरणात क्लोरिनचा वापर करणे, पिण्याचे पाणी गाळून / उकळून वापर करणे, पाण्याचे हौद/विहीर परिसर स्वच्छ करणे, नदी पात्रात कपडे, भांडी, गुरे धुवू नये यासाठी प्रचार करणे इ. उपक्रम हाती घेणे.

७. मानसशास्त्र विभागाद्वारे गांवातील लोकांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यासाठी कार्यशाळा घेणे, शाळेतील मुलांचे विशेषत: दहावी व बारावी विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ॲप्टीयुट टेस्ट घेणे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होण्यासाठी कार्यशाळा, स्वच्छता निर्माण करण्यासाठी गांवकऱ्यांमध्ये व मुलांमध्ये बदल घडवून आणणे.

८. रसायन शास्त्र विभागाद्वारे पाण्याचे व मातीचे परिक्षण करणे त्याआधारे जमिनीच्या सुपिकतेचे विवरण तयार करणे तसेच पिण्यायोग्य पाणी व पाण्याचे पृथ्थकरण करून गावांतील लोकांना त्याबद्दल जाणीव जागृती करणे व पाण्यापासून होणाऱ्या आजावर नियंत्रण आणण्यासाठी प्रचार व प्रसार करणे.

९. बांधकाम विभाग तथा अभियांत्रिकी विभाग - या विभागाने ग्रामीण विकास मंत्रालय तथा पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याबरोबर समन्वय साधून गावांमध्ये बायोगॅस सयंत्र निर्माण करण्यासाठी समन्वय साधणे व त्याठिकाणी गुऱ्यांच्या गोठ्यातील मलमुत्र संयत्रात सोडण्याची व्यवस्था करणे किंवा कंपोस्ट खताची निमित्ती करणाऱ्या खड्यात मलमुत्र टाकण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करणे व गोठे स्वच्छ राहतील याची दक्षता घेण्यास सांगणे व विविध विभागातील विद्यार्थ्यांमार्फत प्रचार व प्रसार करणे.

१०. इतर विभागांनी विद्यापीठ दत्तक गावांमध्ये आपआपल्या अभ्यासक्रमाशी संबंधित असलेल्या गोष्टींची अंमलबजावणी कशी होईल याकडे लक्ष पुरविणे.

११. विद्यापीठांनी पुढील ५ वर्षाचा विद्यापीठ दत्तक गावांचा आराखडा तयार करावा. गावांचे तयार करावे, त्यामध्ये पूर्वीचे उपक्रम, दरम्यानचे उपक्रम व उपक्रमानंतरचे फोटो असणे आवश्यक आहे. दत्तक गांव आदर्श गांव, बनवत असताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी गावांमध्ये चराई बंदी, कुऱ्हाड बंदी, नशा बंदी व नस बंदी यांचा प्रचार व प्रसार करावा व गावांतील जन्मदार व मृत्युदर, स्त्रीभ्रुण हत्या इ. गोष्टींवर नियंत्रण आणावेत.

१२. विकास कामाबद्दल होणाऱ्या प्रगतीचा अहवाल मा. कुलगुरु यांनी घेणे अपेक्षित असून त्यांनी दर ६ महिन्यातून एकदा त्या गावाला भेट देणे अपेक्षित आहे.

१३. शासनाच्या प्रतिनिधीकडून या गावांना भेटी देण्यात येतील.


मतदार जागृती अभियानांतर्गत जिल्ह्यातील प्राध्यापकांची बैठक

**रा.से.यो. स्वयंसेवकांना प्रोत्साहनपर**
**१० गुण मिळणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२०१०/(१२५/२०१०)/साशि-७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - २९ डिसेंबर, २०१०

**प्रस्तावना :**

उच्च शिक्षण घेताना, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिवेची भावना निर्माण व्हावी, तसेच समाजकार्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी केंद्र शासनाच्या युवा व क्रीडा मंत्रालयातर्फे तसेच राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम सन १९६९ पासून राबविला जातो.

प्रत्येक स्वयंसेवक नियमित कार्यक्रमांतर्गत प्रत्येक वर्षाला १२० तास असे दोन वर्षात २४० तास कार्य करतो तसेच दोन वर्षात मिळून एक विशेष शिबिरांतर्गत ७ दिवसांचे निवासी शिबिर दत्तक खेडे वा गावात, समाजोपयोगी कार्य करतो.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या दिनांक ०६ जुलै, २०१० च्या राज्यस्तरीय बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे या योजनेत कार्य करणा-या विद्यार्थ्यांना / स्वयंसेवकांना प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांच्या वार्षिक परिक्षेत १० अतिरिक्त गुण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे रा.से.यो. मध्ये कार्य करणा-या सर्व विद्यापीठे /संस्थेमधील / विद्यार्थ्याने / स्वयंसेवकाने वर्षामध्ये १२० तास याप्रमाणे २ वर्षात २४० तास तसेच दोन वर्षात मिळून एक ७ दिवसांचे निवासी शिबिर पूर्ण केल्यास सदर विद्यार्थ्यास / स्वयंसेवकास त्याच्या वार्षिक परिक्षेतील गुणपत्रिकेत प्रोत्साहनपर गुण म्हणून १० गुणांची अतिरिक्त वाढ नमूद करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१०१०२११०८३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( डॉ.प्रमोद पाब्रेकर )
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी

प्रति,
१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
२) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव

D:\My Document\SSD\Note-18.8.2010-Dr.Pabrekar.doc

३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे स्वीय सहाय्यक
४) मा.राज्यपाल यांच्या सचिवांचे स्वीय सहाय्यक
५) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
६) मा.सचिव, शालेय शिक्षण विभाग
७) मा.सचिव, युवा कार्य व क्रिडा विभाग
८) मा.सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
९) मा.सचिव, पर्यावरण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१०) मा.सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक
११) सर्व विद्यापीठांचे कुलगुरु
१२) मा.संचालक, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे स्वीय सहाय्यक
१३) सहाय्यक कार्यक्रम सल्लागार, मनुष्य बळ विकास मंत्रालय, राष्ट्रीय सेवा योजना, पुणे
१४) मा.पुनर्वसन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक
१५) टी.ओ.सी. व टी.ओ.आर.सी. प्रमुख
१६) युवा व समाजिक कार्य करणा-या संस्थांचे प्रतिनिधी -
१) श्री.सुरेश चिरंजीलाल मुरारका
२) श्री.मेहेरनोश पिरोजशहा फिटर
३) श्री.बी.आर.गायकवाड, प्राचार्य, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना
४) श्रीमती मिरा कोर्डे, सचिव, सरस्वती विद्याप्रसारक संस्था
१७) सर्व विद्यापीठांचे रासेयो कार्यक्रम समन्वयक
१८) महालेखापाल, महाराष्ट्र १ / २, मुंबई /नागपूर
१९) अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई
२१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
२२) निवड नस्ती, साशि-७

महाराष्ट्र शासन

क्रमांक-रासेयो-२०११/प्र.क्र.०१/११/साशि-७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्रविद्यालय परि.सर
३ महापालिका मार्ग,धोबितलाव,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- ३/१/११.

<u>महत्वाचे :-</u>

प्रति,
कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व संबधित विद्यापिठ / संस्था / संचालनालये.
महाराष्ट्र राज्य.

विषय : - सन १०-११ या आर्थिक वर्षामध्ये दि.१/४/१० पासून नियमित व विशेष शिबीरे कार्यक्रम राबविण्यासाठी सहाय्यक अनूदाने सुधारित दराने वापराबाबत.

उपरोक्त विषयाबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, कक्षामार्फत आपणास असे कळविण्यात येत आहे कि,केंद्र शासनांचे पत्र क्र. F No.१३ /१/NSS /RC / २०१० - ११ / ९६ to १०८ दि.३०/४/१० न्वये सन २०१०-११ या आर्थिक वर्षापासून दि.१/४/२०१० रासेयो विद्यापिठ निहाय राबविण्यासाठी येणारे नियमित कार्यक्रमासाठी सहाय्यक अनूदान रू.१६०/- ऐवजी सूधारित दर रू.२५०/- व विशेष शिबीरे कार्यक्रमासाठी रू.३००/-ऐवजी सुधारित दर रू.४५०/- प्रति विद्यार्थी करण्यात आलेला आहे.सदर ,केंद्र शासनाच्या निदेशान्वये राज्य शासनाकडे सन २०१०-११ मध्ये डिसेंबर १० च्या हिवाळी अधिवेशनामध्ये उपरोक्त सुधारीत दराप्रमाणे जादा मागणी केलेले सहाय्यक अनूदानास वित्त विभागाकडून मान्यता मिळालेली आहे .तसेच सूधारित दराने सहाय्यक अनूदान मान्यतेनंतर तत्पूर्वीच सर्व विद्यपिठ निहाय कार्यक्रम समन्वयकांना महाराष्ट्र राज्य शासनाचे राज्य संपर्क अधिकारी यांचे भ्रमणध्वनीवरून एस्.एम्.एस्.व्दारा कळविण्यात आले होते.

त्या अनुषंघाने सन २०१०-११ मध्ये रा.से.यो.विद्यापिठ निहाय नियमित व विशेष शिबीरे कार्यक्रम राबविण्यासाठी वर नमूद केलेले सुधारित दरानूसार खर्च करण्यास हरकत नसावी ,याची सर्व कार्यक्रम समन्वयक व वित्त सबंधित अधिकारी यांनी नोंद घेण्यात यावी.

(डॉ प्रमोद न.पब्रिकर )
राज्य संपर्क अधिकारी / वि.का.अधिकारी

प्रत.
सहाय्यक कार्यक्रम सल्लागार ,
राष्ट्रीय सेवा योजना, विभागिय केंद्र पुणे .

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : diplomadesk10dte@gmail.com Website: www.dtemaharashtra.gov.in


कालमर्यादित
दि. २५.१०.२०१६
ई-मेलद्वारे

जा.क्र.१०/एनजीपी /रासेयो/माहिती/२०१६-१७/ ९५८३
दिनांक : 21 OCT 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/पुणे/ नाशिक/नागपूर

विषय- रासेयो विद्यार्थी नोदणीबाबतची तसेच कार्यक्रम अधिकारी यांची २०१६-१७ ची सविंसतर माहिती पाठविणे बाबत....

संदर्भ-राज्य संपर्क अधिकारी , उच्च् व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. रासेयो २०१६/प्र.क्र.१५३/१६/ साशि-७ दि. १८.१०.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र अवलोकनार्थ सोबत जोडण्यात येत आहे. सदरहु पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपले विभागातंर्गत असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये विद्यार्थ्यांकरीता राष्ट्रीय सेवा योजना राबविण्यात येत असल्यास सदर विद्यार्थ्याचे नोंदणी बाबतची पत्रात नमुद विहीत नमुन्यातील आवश्यक माहीती तसेच महाविद्यालयातील/युनिटमधील कार्यक्रम अधिकारी यांचे नांव व मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी या बाबतची माहिती एकत्रित संकलित करुन दि. २५.१०.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजे पर्यत प्रथम प्राधान्याने या संचालनालयास पाठविण्यात यावी. तसेच सदरची माहिती " निरंक" असल्यास निरंक असल्याबाबत कळविण्यात यावे.

सोबत- शासनाचे दि. १८.१०.२०१६ चे पत्र

( डॉ. सुरेश थावलकर )
प्र.सह संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 9564
दिनांक 7 NOV 2016

पत्र प्राप्त झाले
20 OCT 2016
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

महाराष्ट्र शासन
क्रमांक : रासेयो २०१६/प्र.क्र.१५३/१६/ साशि ७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
३,महापालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई – ४०० ००१.
दिनांक – १८ ऑक्टोबर,२०१६.

प्रति,
मा.संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
+२ स्तर/व्यवसाय शिक्षण/तंत्र शिक्षण संचालनालय

विषय :- रासेयो विद्यार्थी नोंदणीबाबतची तसेच कार्यक्रम अधिकारी यांची २०१६-१७ ची सविस्तर माहिती पाठविण्याबाबत.

महोदय,

आज दिनांक १८.१०.२०१६ रोजी नवी दिल्ली येथे, विद्यार्थी नोंदणीबाबतच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेत, महाराष्ट्र विद्यार्थी नोंदणीची यादी का देऊ शकत नाही, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. मा.पंतप्रधान कार्यालयाने दिनांक २५.१०.२०१६ पर्यंत उर्वरीत विद्यार्थी नोंदणी यादी देण्याबाबत अंतिम मुदतवाढ दिलेली आहे. सदर यादी पाठविताना केंद्र शासनाने पाठविलेल्या पुढील विहित नमुन्यातच माहिती आवश्यक आहे.

| Serial No. | State | Name of Volunteer | College/Institution | Name of University/+२ Councils | Contact No. (Mobile) | Email id |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

सदर माहिती देताना प्रत्येक विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी असणे अनिवार्य आहे. अन्यथा ज्या विद्यार्थ्यांचे नाव, मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी प्राप्त होतील, तेवढीच विद्यार्थी संख्या ग्राह्य धरली जाईल(प्राप्त विद्यार्थीसंख्येप्रमाणे सहायक अनुदान दिले जाईल) व उर्वरित वाटप केलेली विद्यार्थी संख्या रद्द होईल, याची कृपया नोंद घ्यावी.

<u>सदर माहितीसोबत प्रत्येक विद्यापीठाने आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील/ युनिटमधील कार्यक्रम अधिकारी यांचे नाव, मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी याबाबतची स्वतंत्र यादी पाठविणे अनिवार्य आहे.</u>

विद्यापीठाने पाठविलेल्या दि.१८.१०.२०१६ पर्यंतच्या प्राप्त माहितीबाबत वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे-

१) पूर्ण माहिती प्राप्त झालेल्या विद्यापीठांची यादी-

| | |
|---|---|
| १ | महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर |
| २ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे |
| ३ | कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक |
| ४ | महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा |
| ५ | भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे |
| ६ | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक |

Inform concerned dept accordingly
D 2/10

२) अपूर्ण माहिती प्राप्त झालेल्या विद्यापीठांची यादी-

| अ.क्र | विद्यापीठाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | अपूर्ण व प्राप्त यादी महाविद्यालयनिहाय नाही |
| २ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | रायगड जिल्ह्यातील काही महाविद्यालये अपूर्ण |
| ३ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. | अपूर्ण |
| ४ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | अपूर्ण |
| ५ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | अपूर्ण (8 महाविद्यालये अप्राप्त) |
| ६ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | अपूर्ण |
| ७ | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | अपूर्ण |
| ८ | S.N.D.T. महिला विद्यापीठ, मुंबई | अपूर्ण |
| ९ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई | अपूर्ण |
| १० | गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली | अपूर्ण |
| ११ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | अपूर्ण |
| १२ | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी. | अपूर्ण |
| १३ | डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | अपूर्ण (विद्यार्थ्यांचे मोबाईल व ई-मेल नाहीत) |
| १४ | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली. | अपूर्ण |
| १५ | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई | अपूर्ण (विद्यार्थ्यांचे मोबाईल व ई-मेल नाहीत) |

३) माहिती अप्राप्त असलेल्या विद्यापीठांची यादी-

| | |
|---|---|
| १ | संचालक, शालेय शिक्षण (+ २ स्तर) |
| २ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड |
| ३ | सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| ४ | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |

ज्या विद्यापीठांची माहिती प्राप्त आहे, परंतु अपूर्ण आहे (विद्यार्थी नाव / मोबाईल क्रमांक / ईमेल आयडी) अशा विद्यापीठांनी परिपूर्ण माहिती देणे अनिवार्य आहे. तसेच विद्यापीठाने *माहिती पाठविताना, ज्या कॉलेजची माहिती जशी आली तशी पाठवून दिलेली आहे (split). अशी माहिती एकत्र संकलित करुन विद्यापीठाची एकत्रित परिपूर्ण माहिती पुन:श्च एकाच ईमेलमध्ये दिनांक २५.१०.२०१६ पर्यंत न चुकता पाठवावी.*

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे माहिती क्षेत्रिय कार्यालय, पुणे व या कार्यालयास पाठवावी. जर आपण माहिती पाठविली नाही व त्याबाबत मा.पंतप्रधान कार्यालयाने जर शंका उपस्थित केली, तर त्याचे उत्तर देणे विद्यापीठास बंधनकारक राहील, कृपया याची नोंद घ्यावी.

आपला

for राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी करीता